प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO
सिडको
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. २४.१०.२०१९**

**सिडको गृहनिर्माण योजना- २०१८ मधील यशस्वी अर्जदारांना सदनिकेच्या किंमतीचा पहिला हफ्ता भरण्यास ७ दिवसांची मुदतवाढ**

सिडको गृहनिर्माण योजना- २०१८ मधील यशस्वी अर्जदारांना सदनिकेच्या किंमतीचा पहिला हफ्ता भरण्यास ७ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे. पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार यासाठी २४ ऑक्टोबर, २०१९ ही अंतिम मुदत होती. परंतु काही अर्जदारांना या कालावधीत रकमेचा भरणा करणे शक्य न झाल्याने सदर मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार यशस्वी अर्जदारांकरिता सदनिकेच्या किंमतीचा पहिला हफ्ता भरण्याची अंतिम मुदत आता ३१ ऑक्टोबर, २०१९ अशी असणार आहे. या मुदतीत पहिला हफ्त्याची रक्कम भरणाऱ्या अर्जदारांकडून कोणत्याही प्रकारचे विलंब शुल्क आकारण्यात येणार नाही.

सिडको गृहनिर्माण योजना-२०१८ अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (प्रधानमंत्री आवास योजना) आणि अल्प उत्पन्न गट यांकरिता नवी मुंबईतील अकरा ठिकाणी एकूण १४,८३८ घरे (सदनिका) उपलब्ध करून देण्यात आल्या होती. या योजनेची संगणकीय सोडत २ ऑक्टोबर, २०१८ रोजी पार पडली होती.

सदर मुदतवाढ ही केवळ सदनिकेच्या किंमतीच्या पहिल्या हफ्त्याची रक्कम भरण्याकरिता देण्यात आली असून यापुढील हफ्ते अर्जदारांनी पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार भरावयाचे आहेत. तसेच योजनेतील पुढील प्रक्रियाही पूर्वनियोजित वेळापत्रकानुसारच पार पडतील याची संबंधित अर्जदारांनी नोंद घ्यावी, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

---

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**